- 2 JUL 2017
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रंगमिश्रित सांडपाण्यावर होणार संशोधन

## दीड कोटीचा प्रकल्प मंजूर : संयुक्तरीत्या होणाऱ्या प्रकल्पाचे नेतृत्व विद्यापीठाकडे





कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील प्रा. डॉ. ज्योती जाधव यांचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १ : केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या जैवतंत्रज्ञान विभागातर्फे (डीबीटी, नवी दिल्ली) रंगमिश्रित सांडपाण्यावर प्रक्रियेबाबत संशोधनासाठी सुमारे दीड कोटी रुपयांचा प्रकल्प मंजूर झाला आहे. विशेष म्हणजे तीन विद्यापीठांमध्ये संयुक्तरीत्या होणाऱ्या राष्ट्रीय प्रकल्पाचे नेतृत्व शिवाजी विद्यापीठाच्या जीवरसायनशास्त्र अधिविभागातील प्रा. डॉ. ज्योती जाधव यांच्याकडे दिले आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी ग्रंथ भेट देऊन त्यांचे अभिनंदन केले.

स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत हा प्रकल्प मंजूर केला असून, शिवाजी विद्यापीठासह इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, हैदराबाद आणि चारोतर युनिव्हर्सिटी ऑफ सायन्स ॲंड टेक्नॉलॉजी, गुजरात या तीन संस्थांमध्ये या प्रकल्पाबाबत संयुक्त संशोधन होणार आहे. विद्यापीठामध्ये डॉ. जाधव या प्रकल्पप्रमुख, तर प्रा. एस. पी. गोविंदवार उप-प्रकल्पप्रमुख काम पाहणार आहेत. या प्रकल्पासाठी डीबीटीकडून दीड कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

प्रकल्पाबाबत डॉ. जाधव म्हणाल्या, "वस्त्रोद्योगाशी संबंधित कारखान्यातून बाहेर पडणारे रंगमिश्रित सांडपाणी विनाप्रक्रिया नदीपात्रात सोडले जाते. या रंगमिश्रित सांडपाण्यातील विषारी रासायनिक प्रदूषकांमुळे अनेक प्रकारच्या रोगांना सामोरे जावे लागते. पाण्यातील वनस्पती व जलचरांबरोबरच मानवावरही त्याचे दुष्परिणाम होतात. विविध ॲलर्जिक रिॲक्शन, म्युटेशन, अगदी कर्करोगही होतो. हे रंगमिश्रित सांडपाणी नदीत सोडण्यापूर्वी त्यावर प्रक्रिया करण्यासाठी सर्वच स्तरांवर शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत."

### एमआयडीसीमध्ये प्रकल्प यशस्वीरीत्या कार्यान्वित

सध्या रंगमिश्रित सांडपाणी प्रक्रिया कागल येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एम.आय.डी.सी.) सात एकर जागेवर प्रत्यक्ष यशस्वीपणे कार्यरत आहे. कागल एम.आय.डी.सी.मध्ये ४५ एकर क्षेत्रात हाय रेट ट्रान्समिशन सिस्टीम (एच.आर.टी.एस.) तयार केली आहे. यामध्ये सलग नाला तयार करून बांधावर निलगिरी लावली आहे. या नाल्यातून सांडपाणी सोडले जाते. कॉमन एफ्लूयंट ट्रीटमेंट प्लॅंट (सी.इ.टी.पी.) त्यांच्याकडील सांडपाणी बायोरिमेडिएशन प्रक्रियेकरिता एच.आर.टी.एस. यंत्रणेमध्ये सोडतात. या यंत्रणेचा फायदा असा, की यातील निलगिरीची झाडे जास्तीत जास्त सांडपाणी शोषून घेतात. त्या सांडपाण्याबरोबर हानिकारक पदार्थही शोषून घेतले जातात आणि झिरो डिस्चार्ज सिस्टीम तयार होते. एच.आर.टी.एस. क्षेत्रात डि-कलरायझेशन (रंग घालवण्याची क्षमता असणारी प्रक्रिया) क्षमता असणाऱ्या वनस्पतींची लागवड करून त्यामध्ये बॅक्टेरिया मिसळून तयार होणाऱ्या सिस्टीमला 'फायटोरिॲक्टर' म्हणतात. ही सिस्टीम अधिक क्षमतेने डि-कलरायझेशन प्रक्रिया करते. ती पर्यावरणपूरक व कमी खर्चिक आहे. प्रा. ज्योती जाधव आणि प्रा. एस. पी. गोविंदवार यांनी या संशोधनावर आधारित सुमारे १६५ शोधनिबंध विविध आंतरराष्ट्रीय संशोधनपत्रिकांतून प्रसिद्ध केले आहेत. डीबीटीच्या नवीन प्रकल्पात डिकलरायझेशन प्रक्रियेच्या जोडीला वीजनिर्मिती करण्याचे ध्येय संशोधकांनी बाळगले आहे.

जनसंपर्क कक्ष
- 2 JUL 2017 महाराष्ट्र टाईम्स शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रंगमिश्रित सांडपाण्यावर होणार संशोधन

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या जैवतंत्रज्ञान विभागातर्फे (डीबीटी, नवी दिल्ली) रंगमिश्रित सांडपाण्यावर प्रक्रियेबाबत संशोधनासाठी सुमारे दीड कोटी रुपयांचा प्रकल्प मंजूर झाला आहे. स्वच्छ भारत अभियानांतर्गत हा प्रकल्प मंजूर करण्यात आला असून शिवाजी विद्यापीठासह इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, हैदराबाद आणि चारोतर युनिव्हर्सिटी ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी, गुजरात या तीन संस्थांमध्ये या प्रकल्पाबाबत संयुक्त संशोधन होणार आहे. शिवाजी विद्यापीठामध्ये डॉ. ज्योती जाधव या प्रकल्पप्रमुख, तर प्रा. एस.पी. गोविंदवार उप प्रकल्पप्रमुख काम पाहणार आहेत.

या प्रकल्पाबाबत प्रकल्पप्रमुख डॉ. जाधव यांनी दिलेल्या माहितीनुसार, वस्त्रोद्योगाशी संबंधित कारखान्यातून बाहेर पडणारे रंगमिश्रित सांडपाणी विनाप्रक्रिया नदीपात्रात सोडले जाते. या रंगमिश्रित सांडपाण्यातील विषारी रासायनिक प्रदूषकांमुळे अनेक प्रकारच्या रोगांना सामोरे जावे लागते. पाण्यातील वनस्पती व जलचरांबरोबरच मानवावरही त्याचे दुष्परिणाम होतात. विविध ॲलर्जिक रिॲक्शन, म्युटेशन, अगदी कर्करोगही होतो. हे रंगमिश्रित सांडपाणी नदीत सोडण्यापूर्वी त्यावर प्रक्रिया करण्यासाठी सर्वच स्तरांवर शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत.

डॉ. जाधव म्हणाल्या, 'वस्त्रोद्योग कारखान्यात मोठ्या प्रमाणावर मानवनिर्मित रासायनिक पदार्थ व रंगद्रवे वापरली जातात. त्यामध्ये वापरल्या जाणाऱ्या मोठ्या सेंद्रिय कणांना ॲझो संयुग म्हणतात. नायट्रोजनमध्ये तीन घट्ट बंध असतात, त्यामुळे ते निसर्गात खूप काळ जसेच्या तसे आढळून येतात. या ॲझो संयुगाचे निसर्गात पुन्हा वापर करण्याकरिता त्यामधील घट्ट बंध तुटून त्याचे साध्या बंधामध्ये रुपांतर करण्यासाठी त्यावर प्रक्रिया करणे गरजेचे असते. सांडपाणी प्रक्रिया केंद्रात रंगमिश्रित सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते, पण काही रासायनिक पदार्थ यामध्ये प्रक्रियेनंतरही आढळून येतात.'

शिवाजी विद्यापीठात 'बायोरिमेडिएशन' प्रक्रियेने रंगमिश्रित सांडपाणी स्वच्छ करण्याची पद्धत प्रायोगिक तत्त्वावर जवळपास गेल्या दहा वर्षांपासून केली जात असून या प्रयोगशाळेचा या क्षेत्रात जगात प्रथम क्रमांक आहे.



**डीबीटी संस्थेकडून रंगमिश्रित सांडपाण्यावर प्रक्रियेबाबत संशोधन प्रकल्प मंजूर झाल्याबद्दल कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी डॉ. ज्योती जाधव यांचे ग्रंथभेट देऊन अभिनंदन केले. यावेळी उपस्थित प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, डॉ. भारती पाटील, डॉ. अनिल घुले, डॉ. एस.बी. सादळे.**

## एमआयडीसीमध्ये प्रकल्प कार्यान्वित

सध्या रंगमिश्रित सांडपाणी प्रक्रिया कागल एमआयडीसीत सात एकर जागेवर प्रत्यक्ष यशस्वीपणे कार्यरत आहे. त्यासाठी ४५ एकर क्षेत्रात हाय रेट ट्रान्समिशन सिस्टीम तयार केली आहे. यामध्ये सलग नाला तयार करून बांधावर निलगिरी लावली आहे. या नाल्यातून सांडपाणी सोडले जाते. कॉमन एफ्युयंट ट्रीटमेंट प्लँट त्यांच्याकडील सांडपाणी बायोरिमेडिएशन प्रक्रियेसाठी एचआरटीएस यंत्रणेमध्ये सोडतात. या यंत्रणेचा फायदा असा की, यातील निलगिरीची झाडे जास्तीत जास्त सांडपाणी शोषून घेतात. त्या सांडपाण्याबरोबर हानिकारक पदार्थही शोषून घेतले जातात आणि झिरो डिस्चार्ज सिस्टीम तयार होते. एचआरटीएस क्षेत्रात रंग घालवण्याची क्षमता असणारी प्रक्रिया क्षमता असणाऱ्या वनस्पतींची लागवड करून त्यामध्ये बॅक्टेरिया मिसळून तयार होणाऱ्या सिस्टीमला 'फायटोरिॲक्टर' म्हणतात. ही सिस्टीम अधिक क्षमतेने डि-कलरायझेशन प्रक्रिया करते.

- 2 JUL 2017
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रंगमिश्रित पाणी प्रक्रिया प्रकल्पास मंजुरी

## राष्ट्रीय प्रकल्पाच्या प्रमुखपदी डॉ. ज्योती जाधव यांची निवड

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या जैवतंत्रज्ञान विभागातर्फे (डीबीटी, नवी दिल्ली) रंगमिश्रित सांडपाण्यावर प्रक्रियेबाबत संशोधनासाठी सुमारे दीड कोटी रुपयांचा प्रकल्प मंजूर झाला आहे. विशेष म्हणजे तीन विद्यापीठांमध्ये संयुक्तरीत्या होणाऱ्या या राष्ट्रीय प्रकल्पाचे नेतृत्व शिवाजी विद्यापीठाच्या जीव-रसायनशास्त्र अधिविभागातील प्रा. डॉ. ज्योती जाधव यांच्याकडे देण्यात आले आहे. याबद्दल कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी ग्रंथ भेट देऊन अभिनंदन केले.

स्वच्छ भारत अभियानांतर्गत हा प्रकल्प मंजूर करण्यात आला असून, शिवाजी विद्यापीठासह इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, हैदराबाद आणि चारोतर युनिव्हर्सिटी ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी, गुजरात या तीन संस्थांमध्ये या प्रकल्पाबाबत संयुक्त संशोधन होणार आहे. शिवाजी विद्यापीठामध्ये डॉ. ज्योती जाधव या प्रकल्प प्रमुख, तर प्रा. एस. पी. गोविंदवार उप-प्रकल्प प्रमुख काम पाहणार आहेत.

या प्रकल्पाची माहिती देताना प्रकल्प प्रमुख डॉ. जाधव म्हणाल्या, शिवाजी विद्यापीठात बायोरिमेडिएशन प्रक्रियेने रंगमिश्रित सांडपाणी स्वच्छ करण्याची पद्धत प्रायोगिक तत्त्वावर केली जात आहे. या प्रयोगशाळेचा या क्षेत्रात जगात प्रथम क्रमांक आहे. बायोरिमेडिएशन प्रक्रियेने नैसर्गिकरीत्या सांडपाण्यावर यशस्वीपणे प्रक्रिया केली जाते. दरम्यान, हा प्रकल्प मंजूर झाल्याबद्दल कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी डॉ. ज्योती जाधव यांचे अभिनंदन केले. याप्रसंगी प्रभारी प्र-कुलगुरु डॉ. डी.टी. शिर्के, डॉ. भारती पाटील, डॉ. अनिल घुले, उपस्थित होते.



डीबीटी यांच्याकडून रंगमिश्रित सांडपाण्यावरील प्रक्रियेबाबत प्रकल्प मंजूर झाल्याबद्दल कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी डॉ. ज्योती जाधव यांचे ग्रंथभेट देऊन अभिनंदन केले. याप्रसंगी प्रभारी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. भारती पाटील, डॉ. अनिल घुले, डॉ. एस.बी. सादळे उपस्थित होते.

### एमआयडीसीमध्ये प्रकल्प कार्यान्वित

रंगमिश्रित सांडपाणी प्रक्रिया कागल येथील एम.आय.डी.सीच्या सात एकर जागेवर प्रत्यक्ष यशस्वीपणे कार्यरत आहे. ४५ एकर क्षेत्रात हाय रेट ट्रान्समिशन सिस्टीम तयार केली आहे. यामध्ये सलग नाला तयार करुन बांधावर निलगिरी लावली आहे. या नाल्यातून सांडपाणी सोडले जाते. कॉमन एफ्लूयंट ट्रीटमेंट प्लँट (सी.इ.टी.पी.) त्यांच्याकडील सांडपाणी बायोरिमेडिएशन प्रक्रियेकरिता एचआरटीएस यंत्रणेमध्ये सोडतात. यातील निलगिरीची झाडे सांडपाणी शोषून घेतात. त्या सांडपाण्याबरोबर हानीकारक पदार्थ देखील शोषून घेतले जातात आणि झिरो डिस्चार्ज सिस्टीम तयार होते.

- 2 JUL 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वृक्षलागवडीला राज्यात उत्स्फूर्त प्रतिसाद

## पालकमंत्री : जिल्ह्यातील मोहिमेला प्रारंभ; यंदा ४ कोटी वृक्षलागवडीचे उद्दिष्ट

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

पर्यावरण संतुलनासाठी राज्य शासनाने ५० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठेवले असून जनतेकडून वृक्षलागवड कार्यक्रमास संपूर्ण राज्यभर उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. गेल्या वर्षी २ कोटी ८२ लाख वृक्षलागवड केली असून यंदा ४ कोटींचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असले तरी प्रत्यक्षात ६ कोटी पर्यंत वृक्षलागवड होईल, असा विश्वास व्यक्त करून पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी वृक्षसंवर्धनासाठी अधिक झाडे लावा आणि झाडे जगवा, असे आवाहन केले.

वन विभाग, सामाजिक वनीकरण, कृषी विभाग आणि शिवाजी विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने वृक्ष लागवड मोहिमेचा प्रारंभ तसेच स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्त १ ते ७ जुलै या कृषी सप्ताहाचा प्रारंभही पालकमंत्री पाटील यांच्या हस्ते शिवाजी विद्यापीठ परिसरात करण्यात आला.



**कोल्हापूर : वृक्ष लागवड मोहीम तसेच स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त कृषी सप्ताहाचा प्रारंभही पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते शिवाजी विद्यापीठ परिसरात करण्यात आला. यावेळी शौमिका महाडिक, हसिना फरास, राजगोपाल देवरा, प्रवीण दराडे, अरविंद पाटील, प्रभुनाथ शुक्ल, दीपक खाडे आदी.**

जिल्हा परिषद अध्यक्षा शौमिका महाडिक, महापौर हसिना फरास, कोल्हापूरचे पालक सचिव राजगोपाल देवरा, एमएमआरडीचे अतिरिक्त आयुक्त प्रवीण दराडे, जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार, महापालिका आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, मुख्य वन संरक्षक अरविंद पाटील, उप वनसंरक्षक प्रभुनाथ शुक्ल, सामाजिक वनीकरणाचे उपसंचालक दीपक खाडे, कृषी सहसंचालक डॉ. नारायण शिसोदे आदी उपस्थित होते.

वृक्षलागवड कार्यक्रमांतर्गत १ ते ७ जुलै या कालावधीत राज्यातील जनतेने वृक्ष लावून वृक्ष दिवाळी साजरी करावी, असे आवाहन करत पालकमंत्री पाटील म्हणाले, यंदा राज्यात ४ कोटी वृक्षलागवड करण्यात येणार असून, पुढीलवर्षी ८ कोटी झाडे लावण्याचे नियोजन आहे. शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च शून्य करून उत्पादन वाढविण्याची मोहीम कृषी विभागाने लोकसहभागातून हाती घेणे गरजेचे असल्याचे सांगून पालकमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, जिल्ह्यातही दरवाड गावात यंदा हा प्रयोग प्रायोगिक तत्त्वावर हाती घेतला असून, २६७ कुटुंबांना भातशेतीसाठी बियाणे, खते आणि कीटकनाशके पुरविण्यात आली आहेत. या शेतीतील उत्पादनाला बाजारपेठही मिळवून देण्याचा प्रयत्न आहे. याचपद्धतीने गावागावांत हा प्रकल्प कृषी विभागाने लोकसहभागातून राबवावा.

कोल्हापूरचे पालक सचिव राजगोपाल देवरा म्हणाले, वृक्ष लागवडीची ही मोहीम लोकसहभागातून यशस्वी करण्यासाठी जनतेने पुढाकार घेऊन वृक्षलागवड चळवळीला व्यापक स्वरूप द्यावे. जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार म्हणाले, जिल्ह्यात यंदा ३२ लाख रोपे उपलब्ध असून संस्था, संघटना, मंडळे तसेच जनतेने अधिकाधीक झाडे लावून वृक्षारोपणाची मोहीम यशस्वी करावी. मुख्य वनसंरक्षक अरविंद पाटील यांनी स्वागत करून प्रास्ताविक केले.

पालकमंत्री पाटील यांच्या हस्ते माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आला. यावेळी कृषी क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या शेतकऱ्यांचा सत्कार करण्यात आला. सहायक वन संरक्षक सुहास साळोखे यांनी आभार मानले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, निवासी उपजिल्हाधिकारी संजय शिंदे, प्रांताधिकारी सचिन इथापे, रवींद्र खाडे, उत्तम दिघे, डॉ. हरीष जगताप, सुरेश मगदूम, बसवराज मास्तोळी, चंद्रकांत सूर्यवंशी आदी उपस्थित होते. अलोक जत्राटकर यांनी सूत्रसंचालन केले.

### शेती उत्पादन वाढविणे महत्त्वाचे

राज्यातील शेतकऱ्यांना सुखी समाधानी करण्यासाठी शासन अविरत प्रयत्न करीत आहे. शेतकऱ्यांचे शेती उत्पादन वाढविण्यासाठी आता कृषी अधिकाऱ्यांनी नोकरीकडे सेवा म्हणून न पाहता मिशन म्हणून काम करावे, असे आवाहन करून पालकमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, शासनाने राज्यातील शेतकऱ्यांसाठी ३४ हजार कोटींची कर्जमाफी केली आहे. राज्यातील ८९ लाख लोकांना या कर्जमाफीचा फायदा होणार असून, ४० लाख शेतकऱ्यांचा सातबारा कोरा होणार आहे. आता शेतकऱ्यांसाठी कृषी विभागाने सक्रिय होऊन कृषी विकासाच्या योजना, उपक्रम याची माहिती बांधावर जाऊन देणे गरजेचे आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
-2 JUL 2017
सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मैदानालगत वृक्षारोपण करताना पालकमंत्री चंद्रकांत पाटील. शेजारी महापौर हसीना फरास, जिल्हा परिषद अध्यक्षा शौमिका महाडिक, वनसंरक्षक अरविंद पाटील, पालक सचिव राजगोपाल देवरा आदी.

# दुष्काळ मुक्तीसाठीच ५० कोटी वृक्ष लागवड

## पालकमंत्री : शतकोटी वृक्ष लागवड मोहिमेस सुरवात

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर , ता. १ :"आवश्यकतेपेक्षा राज्यांत ६५ टक्के वृक्ष कमी आहेत. गतवर्षी दोन कोटी ८० लाख वृक्षांची लागवड झाली. टप्प्याटप्प्याने येत्या दोन वर्षांत ५० कोटी वृक्ष लागवडीचे शासनाचे उद्दिष्ट आहे. ते साध्य झाल्यास पर्यावरणाचा बिघडलेला समतोल दूर होऊन दुष्काळातून राज्याची सुटका होण्यास मदत होईल," असा विश्वास पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज येथे व्यक्त केला.

वनविभागातर्फे शिवाजी विद्यापीठाच्या मैदानालगत पालकमंत्री पाटील यांच्या हस्ते वृक्ष लागवड करून शतकोटी वृक्ष लागवड मोहिमेचा प्रारंभ करण्यात आला. या वेळी ते बोलत होते. महापौर हसीना फरास, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा शौमिका महाडिक, पालक सचिव राजगोपाल देवरा, जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार यांच्या हस्तेही वृक्ष लागवड झाली.

पान २ वर »

### पगारासाठी नको मिशन म्हणून काम करा

**माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचा जन्मदिन कृषी दिन म्हणून साजरा होतो. याचा संदर्भ देत श्री. पाटील म्हणाले, "कृषी विभागाला महत्त्वाचे स्थान आहे. केवळ नोकरी म्हणून येथे काम करून चालणार नाही तर मिशन म्हणून काम केले पाहिजे. याच जिल्ह्यात हेक्टरी ११० क्विंटल भाताचे उत्पादन घेणारे शेतकरी आहेत.पण इतर शेतकऱ्यांचे उत्पादन कमी आहे. त्यामुळे जास्त उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांचे मार्गदर्शन इतर शेतकऱ्यांना देण्यासाठी कृषी विभागाने पुढाकार घ्यावा."**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 JUL 2017
सकाळ

# दुष्काळ मुक्तीसाठीच ५० कोटी वृक्ष लागवड

» पान १ वरून

श्री. पाटील म्हणाले, "बांधकामांसाठी झाडे तोडली जात आहेत. काही ठिकाणी रस्ते, धरण, बांधणीसाठी पर्याय नसल्याने झाडे तोडावी लागली आहेत. यातून पर्यावरणाचा समतोल बिघडला आहे. पाऊसमान कमी होत आहे. या स्थितीतून वेळीच सावरण्यासाठी वृक्ष लागवड हाच पर्याय महत्त्वाचा माणून शासनाने वृक्ष लागवड मोहीम हाती घेतली आहे. त्यानुसार यंदा राज्यभरात ४ कोटी वृक्ष लागवड करण्याचे उद्दिष्ट आहे. कोल्हापूर जिल्ह्यात साडेआठ लाख वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट आहे. त्यानुसार १४ लाख वृक्ष लागवडीची येथे नोंदणी झाल्यामुळे येथील उद्दिष्ट पूर्ण होणार आहे."

ते म्हणाले, भविष्यात या झाडांची वाढ व्हावी यासाठी ज्या संस्थांनी झाडे दत्तक घेतली व लावली आहेत आहेत अशा संस्थांना रोजगार हमी योजनेतून निधी देण्याचा शासनाचा मनोदय आहे.

श्री. पाटील म्हणाले, "कोल्हापुरातील टोलविरोधी आंदोलनाचे नेतृत्व करणारे निवास साळोखे यांनी गेल्या वर्षभरात एक लाख रोपे तयार केली आहेत. ही रोपे लावण्यासाठी त्यांनी जागा मागितली. त्यानुसार वनविभागाने भुयेवाडी येथे जागा दिली. तेथे एक लाख वृक्ष लागवड होणार आहे. त्यासाठी प्रातिनिधिक स्वरूपात १ हजार झाडे लावण्यात येणार आहेत."

विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी अलोक जत्राटकर यांनी सूत्रसंचालन केले. वनसंरक्षक अरविंद पाटील, उपवनसंरक्षक डॉ. प्रभुनाथ शुक्ला, शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, कृषी विभागाचे जिल्हा व्यवस्थापक बसवराज मास्तोळी आदी उपस्थित होते.

- 2 JUL 2017

महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वृक्ष दिवाळी साजरी करा

## विद्यापीठातील वृक्षारोपणप्रसंगी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांचे आवाहन

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

'पर्यावरण संतुलनासाठी राज्य सरकारने ५० कोटी वृक्षलागवडीचे उद्दिष्ट ठेवले असून, जनतेकडून वृक्षलागवड कार्यक्रमास संपूर्ण राज्यभर उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. गेल्या वर्षी २ कोटी ८२ लाख वृक्षलागवड केली असून, यंदा ४ कोटींचे उद्दिष्ट ठेवले असले तरी प्रत्यक्षात ६ कोटींपर्यंत वृक्षलागवड होईल. वृक्षलागवड कार्यक्रमांतर्गत एक ते सात जुलै या कालावधीत राज्यातील जनतेने वृक्ष लावून वृक्ष दिवाळी साजरी करावी,' असे आवाहन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.

वन विभाग, सामाजिक वनीकरण, कृषी विभाग आणि शिवाजी विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने वृक्षलागवड मोहिमेचा प्रारंभ तसेच स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त १ ते ७ जुलै या कृषी सप्ताहाचा प्रारंभही पालकमंत्री पाटील यांच्या हस्ते शिवाजी विद्यापीठ परिसरात करण्यात आला. यावेळी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते बकुळीचे रोप लावण्यात आले. जिल्हा परिषद अध्यक्षा शौमिका महाडिक, महापौर हसीना फरास, कोल्हापूरचे पालक सचिव राजगोपाल देवरा, एमएमआरडीचे अतिरिक्त आयुक्त प्रवीण दराडे, जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार, महापालिका आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, शिवाजी विद्यापीठाचे प्रकुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, मुख्य वनसंरक्षक अरविंद पाटील, उप वनसंरक्षक प्रभुनाथ शुक्ल, सामाजिक वनीकरणाचे उपसंचालक दीपक खाडे, कृषी सहसंचालक डॉ. नारायण शिसोदे यांच्यासह अनेक मान्यवर पदाधिकारी, अधिकारी उपस्थित होते.

अमित गद्रे



**वन विभाग, सामाजिक वनीकरण, कृषी विभाग आणि शिवाजी विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने वृक्षलागवड मोहिमेचा प्रारंभ शिवाजी विद्यापीठ परिसरात करण्यात आला. या मोहिमेत मान्यवर उपस्थित होते.**

मटा ग्रीन कोल्हापूर

पालकमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, 'वाढते शहरीकरण आणि कमी होत चाललेली वृक्षसंपदा ही पर्यावरणाच्या दृष्टीने चिंतेची बाब आहे. वृक्ष संवर्धनासाठी संपूर्ण समाजाने सक्रिय योगदान देणे गरजेचे आहे. कोल्हापूर जिल्ह्याचा विचार करता यंदा ८ लाख ७० हजारांहून अधिक झाडे लावण्याचे नियोजन असून, आतापर्यंत १४ हजार लोकांनी ऑनलाइन नोंदणी केली आहे. जिल्ह्यात ही मोहीम अधिक गतिमान करुन संपूर्ण जिल्हा हरित जिल्हा करण्यासाठी सर्वांनी सक्रिय राहूया. शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च शून्य करुन उत्पादन वाढविण्याची मोहीम कृषी विभागाने लोकसहभागातून हाती घेणे गरजेचे आहे. कोल्हापूर जिल्ह्यातही दारवाड गावात यंदा हा प्रयोग प्रायोगिक तत्त्वावर हाती घेतला असून, २६७ कुटुंबांना भातशेतीसाठी बियाणे, खते आणि कीटकनाशके पुरविण्यात आली आहेत.'

कोल्हापूरचे पालक सचिव राजगोपाल देवरा म्हणाले, 'वृक्षलागवडीची मोहीम लोकसहभागातून यशस्वी करण्यासाठी जनतेने पुढाकार घेऊन वृक्षलागवड चळवळीला व्यापक स्वरूप द्यावे. वृक्षारोपण हा दिवाळीसारखा उत्सव म्हणून साजरा करावा.' जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार म्हणाले, 'जिल्ह्यात यंदा ३२ लाख रोपे उपलब्ध असून संस्था, संघटना, मंडळे तसेच जनतेने अधिकाधिक झाडे लावून वृक्षारोपणाची मोहीम यशस्वी करावी.'

मुख्य वनसंरक्षक अरविंद पाटील यांनी स्वागत करून प्रास्ताविकात वन विभागाच्या वतीने 'रोपे आपल्या दारी' या उपक्रमातून १ ते ५ जुलै या काळात नोंदणी करणाऱ्यांना घरपोच रोपे देण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे सांगितले.

याप्रसंगी कृषी क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या शेतकऱ्यांचा पालकमंत्री पाटील यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, निवासी उपजिल्हाधिकारी संजय शिंदे, प्रांताधिकारी सचिन इथापे, रवींद्र खाडे, उत्तम दिघे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच प्रकल्प संचालक डॉ. हरीश जगताप, कृषी अधिकारी सुरेश मगदूम, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बसवराज मास्तोळी, कृषी विकास अधिकारी चंद्रकांत सूर्यवंशी आदींसह पदाधिकारी तसेच अधिकारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी अलोक जत्राटकर यांनी सूत्रसंचालन केले. सहायक वन संरक्षक सुहास साळोखे यांनी आभार मानले.